सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों-२०१७/प्र.क्र.१२/का.११
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ नोव्हेंबर, २०१८

प्रति,
"मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष"
अध्यक्ष अली अहमद अ. रशिद शेख,
अब्दुलरशीद मंजिल, शहवली मोहल्ला, ताजोद्दिन बाबा नगर,
इलाही मस्जिद जवळ, लातूर

विषय :- "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष"" या पक्षाची नोंदणी रद्द करणेबाबत.

संदर्भ :- १) राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९, दि. ३१/३/२००९
२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ११/५/२०१७ चे पत्र.
३) अध्यक्ष, "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" यांनी राज्य निवडणूक आयोगास पाठविलेला दि. १६/१०/२०१८ चा (दि. २८/१०/२०१८ रोजी प्राप्त) अर्ज व त्या सोबतची त्या पक्षाच्या दि. ३/७/२०१८ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत करण्यात आलेल्या ठरावाची प्रत

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भांकीत अ.क्र.२ येथील दि. ११/५/२०१७ च्या पत्रान्वये "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" या पक्षाची नोंदणी करण्यात आली आहे. त्यानंतर "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" या पक्षाचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने संदर्भांकीत अ.क्र. ३ येथे नमूद केलेला अर्ज राज्य निवडणूक आयोगास सादर करण्यात आला असून या अर्जान्वये "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" चे नोंदणी रद्द करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे. अर्जासोबत "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" च्या दि. १३/७/२०१८ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावाची प्रत जोडण्यात

आली आहे. त्यामध्ये "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" चे नोंदणी रद्द करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे असा उल्लेख आहे.

२. वरील वस्तुस्थिती तसेच राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ मधील परिच्छेद ४(२) मधील तरतूद लक्षात घेता, "मजलीस ए इत्तेहादुल मजाहिब (अली) पक्ष" या राजकीय पक्षाची राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणी रद्द करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

आपला,

( राजाराम झेंडे)
सह सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहितीसाठी-

१) विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२) महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद कार्यालय,
५) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती कार्यालय,
६) निवड नस्ती (कार्यासन-११)